विषय:- ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग मॉडयूलद्वारे होणा-या ई-रजिस्ट्रेशन किंवा ई-फायलिंगसाठी दुय्यम निबंधक/ सह दुय्यम निबंधक कार्यालये विहित करण्याबाबत.

क्र.का-४/प्र.क्र.२६९८/१३ (भाग-६)/७३६/१३
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - २८/०३/२०१३.

आदेश :

ज्याअर्थी, नोंदणी अधिनियम १९०८ मध्ये नोंदणी (महाराष्ट्र) सुधारणा कायदा २०१२ अन्वये काही महत्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत, ज्यामध्ये मुख्यत्वे दस्तांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी आवश्यक तरतुदी करण्यात आल्या आहेत, तसेच कलम ८९ अ व कलम ८९ ब अन्वये काही दस्तांच्या सत्यप्रती फायलिंगसाठी सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे,

आणि ज्याअर्थी, या प्रयोजनार्थ 'ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग मॉडयूल' विकसित करण्यात येत आहे, तसेच फाईलिंग कार्यपध्दतीचे विनियमन करण्यासंदर्भात तसेच ई-रजिस्ट्रेशन आणि ई-फायलिंग कार्यपध्दतीसंदर्भात, संबंधित तरतुदीन्वये नियम स्वतंत्ररित्या विहित करण्यात येत आहेत.

आणि ज्याअर्थी, ज्या पोटतुकडीमध्ये एकापेक्षा जास्त दुय्यम निबंधक कार्यालये आहेत, तेथे प्रकल्पाचे सुरुवातीचे टप्प्यामध्ये, ई-रजिस्ट्रेशन आणि ई-फायलिंग करण्याचे काम काही ठराविक सह दुय्यम निबंधक कार्यालयांकडे सोपविल्यास कामकाजात सुलभता येईल, असे या कार्यालयास वाटते,

आणि ज्याअर्थी, ही व्यवस्था प्रशासकीय अधिकारातून, निम्नस्वाक्षरीकार यांचे स्तरावर करणे शक्य आहे असे मत विधी व न्याय विभागाने व्यक्त केले आहे,

त्याअर्थी, उपरोक्त बाबतीत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत --

१) ज्या नोंदणी पोटतुकडीमध्ये, केवळ एकच दुय्यम निबंधक कार्यालय अस्तित्वात आहे, त्या पोटतुकडीमधील मिळकतींसंदर्भातील दस्तांची ई-रजिस्ट्रेशन प्रणालीद्वारे नोंदणी करण्याचे तसेच ई-फायलिंगद्वारे फायलिंग करण्याचे काम संबंधित दुय्यम निबंधक या संदर्भातील नियमांनुसार करतील.

२) ज्या पोटतुकडीमध्ये, दुय्यम निबंधकाबरोबरच सह दुय्यम निबंधक कार्यालये अस्तित्वात आहेत त्या ठिकाणी, उपरोक्त नमूद काम पुढे नमूद केलेले सह दुय्यम निबंधक, त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या दिवशी प्रणालीमध्ये सादर केलेल्या दस्तांचे बाबतीत, आपापल्या कार्यालयाचे कामाचे दिवशी व कार्यालयीन वेळात पूर्ण करतील.

| अ.क्र. | पोटतुकडी | सह दु.नि.कार्यालय | कोणत्या दिवशी दाखल होणारे दस्त |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर-१ | सह दुय्यम निबंधक अहमदनगर-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २ | अकोला-१ | सह दुय्यम निबंधक अकोला-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ३ | अमरावती शहर-१ | सह दुय्यम निबंधक अमरावती-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ४ | औरंगाबाद-१ | सह दुय्यम निबंधक औरंगाबाद-२ | सोमवार ते बुधवार |
| ५ | औरंगाबाद-१ | सह दुय्यम निबंधक औरंगाबाद-३ | गुरुवार ते रविवार |
| ६ | करवीर-१ | सह दुय्यम निबंधक करवीर-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ७ | जळगाव-१ | सह दुय्यम निबंधक जळगाव-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ८ | जालना-१ | सह दुय्यम निबंधक जालना-३ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ९ | ठाणे-१ | सह दुय्यम निबंधक ठाणे-२ | सोमवार, मंगळवार |
| १० | ठाणे-१ | सह दुय्यम निबंधक ठाणे-५ | बुधवार, गुरुवार |
| ११ | ठाणे-१ | सह दुय्यम निबंधक ठाणे-९ | शुक्रवार ते रविवार |
| १२ | कल्याण-१ | सह दुय्यम निबंधक कल्याण-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| १३ | भिवंडी-१ | सह दुय्यम निबंधक भिवंडी-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| १४ | वसई-१ | सह दुय्यम निबंधक वसई-३ | आठवडयाचे सर्व दिवस |
| १५ | धुळे-१ | सह दुय्यम निबंधक धुळे-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| १६ | नागपूर-१ | सह दुय्यम निबंधक नागपूर-२ | सोमवार, मंगळवार |
| १७ | नागपूर-१ | सह दुय्यम निबंधक नागपूर-४ | बुधवार, गुरुवार |
| १८ | नागपूर-१ | सह दुय्यम निबंधक नागपूर-८ | शुक्रवार ते रविवार |
| १९ | नागपूर-१० | सह दुय्यम निबंधक नागपूर-१० | आठवडयाचे सर्व दिवस |
| २० | नाशिक-१ | सह दुय्यम निबंधक नाशिक-५ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २१ | मालेगाव-१ | सह दुय्यम निबंधक मालेगाव-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २२ | नांदेड-१ | सह दुय्यम निबंधक नांदेड-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २३ | हवेली-१ | सह दुय्यम निबंधक हवेली-२१ | सोमवार, मंगळवार |
| २४ | हवेली-१ | सह दुय्यम निबंधक हवेली-२२ | बुधवार, गुरुवार |
| २५ | हवेली-१ | सह दुय्यम निबंधक हवेली-२३ | शुक्रवार ते रविवार |
| २६ | मावळ | सह दुय्यम निबंधक मावळ-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २७ | मुळशी | सह दुय्यम निबंधक मुळशी-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २८ | खेड | सह दुय्यम निबंधक खेड-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| २९ | शिरुर | सह दुय्यम निबंधक तळेगाव | आठवडयाचे सर्व दिवस |
| ३० | मुंबई शहर-१ | सह दुय्यम निबंधक मुंबई-४ | सोमवार ते बुधवार |
| ३१ | मुंबई शहर-१ | सह दुय्यम निबंधकमुंबई-५ | गुरुवार ते रविवार |
| ३२ | अंधेरी-१ | सह दुय्यम निबंधक अंधेरी-५ | सोमवार ते बुधवार |
| ३३ | अंधेरी-१ | सह दुय्यम निबंधक अंधेरी-६ | गुरुवार ते रविवार |
| ३४ | बोरिवली-१ | सह दुय्यम निबंधक बोरिवली-६ | सोमवार, मंगळवार |

| अ.क्र. | पोटतुकडी | सह दु.नि.कार्यालय | कोणत्या दिवशी दाखल होणारे दस्त |
|---|---|---|---|
| ३५ | बोरिवली-१ | सह दुय्यम निबंधक बोरिवली-८ | बुधवार, गुरुवार |
| ३६ | बोरिवली-१ | सह दुय्यम निबंधक बोरिवली-९ | शुक्रवार ते रविवार |
| ३७ | कुर्ला-१ | सह दुय्यम निबंधक कुर्ला-३ | सोमवार ते बुधवार |
| ३८ | कुर्ला-१ | सह दुय्यम निबंधक कुर्ला-४ | गुरुवार ते रविवार |
| ३९ | यवतमाळ-१ | सह दुय्यम निबंधक यवतमाळ-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ४० | पनवेल-१ | सह दुय्यम निबंधक पनवेल-४ | सोमवार ते बुधवार |
| ४१ | पनवेल-१ | सह दुय्यम निबंधक पनवेल-५ | गुरुवार ते रविवार |
| ४२ | सातारा-१ | सह दुय्यम निबंधक सातारा-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ४३ | सोलापूर उत्तर-१ | सह दुय्यम निबंधक सोलापूर उत्तर-२ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ४४ | मिरज-१ | सह दुय्यम निबंधक मिरज-३ | आठवडयाचे सर्व दिवस |
| ४५ | लातूर - १ | सह दुय्यम निबंधक लातूर - २ | आठवडयाचे सर्व दिवस |

या ठिकाणी हे स्पष्ट करण्यात येत आहे की, सदर व्यवस्था केवळ 'ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग मॉडयूल' द्वारे नोंदणी/फायलिंगसाठी दाखल होणा-या दस्ताबाबत आहे.

सही/- (श्री.एस्.चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रति- १) राज्यातील सर्व दुय्यम निबंधक.

प्रत:- १) उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
३) सर्व सह जिल्हा निबंधक
४) सर्व कार्यासन अधिकारी
५) प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे.

निर्गमित

२८/३/१३

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणेकरिता.